Historicity Research Journal
Volume 1 | Issue 10 | June 2015 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# *सातारा येथील प्रतिसरकारला खानदेशाचे योगदान*

**विलास वसंतराव पाटील**

मु.पो.झाडी ता.अमळनेर जि.जळगाव

**सारांश :-**

□ानदेशातील डॉ. उत्तमराव पाटील प्रतिसरकारच्या कार्यक्षेत्रात दा□ल झाल्याने, त्यांच्या रुपात व त्यांच्या सहकाऱ्यांच्या निमित्ताने सातारच्या प्रतिसरकारच्या चळवळीस खानदेशातील भूमिगतांचाही हातभार लागला होता. सातारा आणि खानदेश यांच्या संबंधावर प्रादेशिक इतिहास लेखनाच्या अंगाने चर्चा करणे अगत्याचे आहे. दोन्ही प्रादेशिक विभागात १९४२ च्या चले जाव आंदोलनाची सुरुवात ९ ऑगस्ट १९४२ पासून सुरु झाली.

***प्रस्तावना :***

□ांतीपर्वाची धग दोन्ही विभागात सारखीच होती. मोर्चा, निदर्शने, सभांचे सत्र आटोपून जाळपोळ, ब्रिटीश यंत्रणा खिळखिळी करण्यासाठी रेल्वे रुळ उखळणे, फिश प्लेट काढणे, टेलिफोन व टेलिग्राफ तारा तोडणे, महसूल खजिन्याच्या लुटी करणे, रेल्वे उलटविण्याचा प्रयत्न करणे इ.सारख्या स्वरुपात कमी - अधिक प्रमाणात हालचाली सुरु होत्या. खानदेशात तर प्रथमच १५ ऑगस्ट १९४२ रोजी अमळनेरला प्रसिद्ध जळितकांड घडवून आणून आंदोलनास आक्रमक व क्रांतीकारी वळण दिले ते डॉ. उत्तमराव व त्यांच्या पत्नी लीलाताई पाटील यांनी. साताऱ्याकडे स्वातंत्र्याच्या लढाईत क्रां. नाना पाटील, व वाय. बी. चव्हाण, वसंतदादा पाटील, बाबुजी पाटणकर इ. नेत्यांनी आंदोलने संघटित केली होती. या सर्वात जास्त बोलबाला, करिश्मा, वलयांकीत व्यक्तिमत्व, मुखोद्गत असणारे नाव म्हणजे क्रां. नाना पाटील होत. या साताऱ्यातच स्वांतत्र्याच्या अंतिम क्रांतिपर्वातील सर्वात महत्वाची व दैदिप्यमान घटना म्हणजे १९४६ पर्यंत चाललेली **'**प्रतिसत्तेची**'** चळवळ होय.

□ानदेशातील अमळनेरच्या प्रसिद्ध जाळपोळीचे सूत्रधार म्हणून लीलाताईंना प्रदीर्घ कारावासाची शिक्षा झाली तर डॉ. उत्तमराव पाटलांनी पोलीसांच्या हातावर तुरी देत परागंदा होऊन भूमिगत राहण्याचा निर्णय घेतला. ऑगस्ट १९४२ ते जानेवारी १९४४ डॉ. उत्तमराव भूमिगत राहून परागंदा होते. तो लढा यशस्वीपणे खानदेशातल्या पूर्व व पश्चिम भागातल्या क्रांतीकारकांनी भूमिगत होऊन जळता ठेवला होता. साताऱ्यात प्रमुख काँग्रेस नेत्यांना अटक झाल्याने, नाना पाटील व त्यांच्या साथीदारांनी अटक न होता, भूमिगत राहून लढा चालविण्याचा निर्धार केला होता. सर्वदूर भारतात १९४२ चा लढा ओसरत होता तर खानदेश चिमठाणा खजिना लुट व इतर क्रांतीकार्यांनी प्रज्वलीत होत होता तर सातारा प्रतिसरकारच्या यशाने धगधगत होता. या सरकारास खानदेशातील भूमिगतांनी आपल्या प्राणांची बाजी लावून आपलेही योगदान त्यात नोंदवलेले आहे. त्याचा हा लेखाजोखा.

**पश्चिम खानदेशातील चिमठाणा खजिनालुट -** □ानदेश व साताऱ्याच्या समन्वयातून आपल्या आर्थिक गरजेपोटी भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहली जावी अशी, सिनेस्टाईल, रोमांचकारी व चित्तथरारक घटना म्हणजे चिमठाणा खजिना लूट. ती भारतातील सर्वात मोठी सरकारी खजिना लुट होती. १४ एप्रिल १९४४ रोजी सातारच्या जी.डी. लाड, नागनाथ नायकवडी, अप्पा दाजी पाटील, धोंडीराम माळी, रावसाहेब कळके, किसन मास्तर यांच्यासह □ानदेशातील डॉ. उत्तमराव पाटील व शंकर पांडू माळी यांची प्रमुख भूमिका तीत होती. निर्णायक व मार्गदर्शक स्वरुपात विष्णूभाऊ पाटील, (कापडणे) ओंकार बापू पाटील, (बोरकुंड) फकिरा अप्पा देवरे,

(वडजाई) रामचंद्र पाटील (मोहाडी) व्यंकटराव धोबी, (शिरपुर) धुडकूभाऊ ठाकरे, (कापडणे) पोलीस खात्यातील चंद्रकांत पाटील व भाऊराव शिंदे, यशवंत सुकदेव पाटील, (जुनवणे ) यांची भूमिका होती तर पाठराखण म्हणून खजिना साताऱ्यात पोहोचेपर्यंत असंख्य भूमिगतांनी, खानदेशी लोकांनी व गावांनी मदत केल्याचे विसरुन चालणार नाही.

**पूर्व ा-नदेश -** पुर्व खानदेशातील भुसावलचे सोनू आनंदा पंडीत व बोदवडचे माधवराव धनाजी पाटील जे पंजाब मेल उलथविण्याच्या कटातील सूत्रधार होते तेही परांगदा झाले आणि भूमिगत होऊन खजिना लुटीच्या प्रकरणात सहभागी झाले. माधवराव धनाजी पाटलांनी खजिना लुटीतल्या प्रमुख आरोपी डॉ. उत्तमराव पाटलांना अटक न होण्यासाठी मदत केली. त्या प्रकरणात खानदेशाच्या वाटयाला आलेल्या पैशांची विल्हेवाट लावणेकामी अल्प का असेना अशा स्वरूपाची ती मदत होती. तथापि पंढरपुर पलायना प्रसंगी डॉ.उत्तमराव व माधवराव पाटलात झालेल्या पत्रव्यवहाराने चौकशीचा ससेमिरा माधवराव पाटलांच्या मागे लागल्याने डॉ. उत्तमरावांचा ठावठिकाणा न सांगणारे त्यांचे हे अप्रत्यक्ष योगदान आहे हे लक्षात घ्यावयास हवे.[१] याशिवाय प्रतिसत्तेची चळवळ संबंध महाराष्ट्रात पसरविण्याच्या कार्यक्रमात माधवराव पाटलांनी महत्वाची भूमिका बजावली होती. सोनुसिंग पंडीत परादा झाल्यापासुन पोलीसांना सापडले नाहीत. त्यांचा खुप शोध घेण्याचा खानदेशात कार्यरत समाजवादी पुढारी मधु लिमये यांनी प्रयत्न केला असता ते चिमठाणा खजिना लुटीच्या कार्यक्रमात सामील झालेले त्यांना दिसले. याविषयी मधु लिमये आपल्या आत्मचरित्रात लिहतात, “पोलिसांच्या ससेमिऱ्यामुळे आम्हाला भुसावळची टोळीही मोडावी लागली. सुरक्षिततेसाठी पंडीत वगैरे कार्यकर्ते दुसरीकडे हलविले गेले. पुढे उत्तमराव पाटलांच्या टोळीत तो सामील झाला. पश्चिम खानदेशातील चिमठाणे येथे साडेपाच लाखांचा खजिना लुटण्याच्या प्रकरणात तो उत्तम पाटील व विष्णू पाटील यांचा साथीदार होता. असे मला तुरुंगात असतांना समजले.”[२]

पुढे महाराष्ट्रभर प्रतिसत्तेच्या विस्तारात पूर्व खानदेशात तळ उभारण्यात यां व्दयींचा वाटा होता. जी.डी. लाड आपल्या आत्मचरित्रात नोंदवितात की, सोनुभाऊ पंडीत, (शेलवड) माधव पाटील (बोदवड) कोल्हाटकर आदि मंडळी कलकत्ता - मेल डिरेलमेंट - केसमध्ये गुंतलेली, माझ्या घारीच्या दृष्टीला ती क्रांतीची पिल्ले दिसली. त्यांचा एक संच उभा केला.”[३] प्रतिसत्तेचा महाराष्ट्रभर फैलाव करत असता पूर्व खानदेशात सोनुभाऊ पंडीत, माधव धनाजी पाटील यांनी तळ उभा केला. त्यांना प्रशिक्षण व कार्याची माहीती देण्यासाठी कॅ.आकाराम पवार व कॅ. रामचंद्र लाड, कुंडल यांनी खानदेशात कॅम्प घेतले होते. त्यात त्यांना खूप मोठया प्रमाणात यश प्राप्त झाल्याचे कॅ. आकाराम पवार व कॅ. रामचंद्र लाड आपल्या मुलाखतीत सांगतात.[४] स्वातंत्र्यानंतरही त्यांचे संबंध हे मित्रत्वाचे व त्या ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार म्हणून आजतागायत टिकून होते. अशा रितीने डॉ. उत्तमरावांच्या सहकार्यानेच पूर्व खानदेशातील हे दोघे क्रांतीवीर माधवराव पाटील, बोदवड व सोनुभाऊ पंडीत, सेलवड साताऱच्या प्रतिसरकारच्या कार्यात पुन्हा सक्रिय झाले. त्यांच्या माध्यमातून खानदेशात साताऱचे प्रतिसरकार उभारण्याचे स्वप्न डॉ. उत्तमरावांनी पाहीले व ते साकार करण्यासाठी फिल्डमार्शल जी.डी. लाडांचे मार्गदर्शन आणि कॅ. आकाराम पवार व कॅ. रामभाऊ लाड, कुंडल हे प्रत्यक्ष झटले होते.

प्रत्यक्ष प्रतिसरकारात खानदेशचे डॉ. उत्तमराव पाटील व त्यांच्या पत्नी क्रां. लीलाताई पाटील सहभागी झाले होते. तुफान सेनेचे सेनानी, प्रशिक्षक, व्याख्याते, आचारी, प्रचारक या नानाविध भूमिकेतून डॉ. उत्तमराव पाटलांनी प्रतिसत्तेच्या चळवळीस हातभार लावला. शिवाय ज्येष्ठ सेनानी, मार्गदर्शक, प्रतिसरकारचे घटनाकार, जी.डी. बापूंच्या विवाहाचे पुरोहीत अशा भूमिकाही त्यांनी पार पाडल्या. या साताऱच्या प्रतिसरकारात डॉ. उत्तमरावांचे योगदान अप्पासाहेब लाड मांडतात की, “ वर्षा - दीड वर्षाच्या फरारीपणाच्या काळात डॉ. उत्तमराव साताऱ्यांतच होते. त्यांचा ग्रामराज्य - स्थापनेस अत्यंत उपयोग झाला.”[५] साताऱच्या चळवळीतील एक स्वातंत्र्यसैनिक ग.स. ऊर्फ दादासाहेब आळतेकर आपल्या लेखात डॉ. उत्तमरावांच्या कार्याबद्दल लिहतात की, “ानदेशचे डॉ. उत्तमराव पाटील यांनी आपल्याबरोबर तिकडील भूमिगत घेऊन १९४५ च्या प्रारंभापासून नाना पाटील, जी.डी. लाड, व अप्पा लाड यांच्याशी चर्चा व सहकार्य करुन त्या सर्वांनी प्रतिसरकार व त्याची कार्याची रुपरेखा निश्चित केली. गावोगाव सभा घेऊन ह्या कार्याचा प्रचार व प्रसार ला व ग्रामन्यायालये मूर्त स्वरुपात आणली. ”[६]

याशिवाय अत्यंत महत्वाचा मुद्दा विचारार्थ ठेवासा वाटतो तो असा की, प्रतिसरकारला घटना होती, जरी ती अलिखित किंवा छोटेखानी असली तरी. यापूर्वी चर्चिल्या प्रमाणे त्या घटनेची परिभाषा, संहितीकरण डॉ. उत्तमराव पाटलांनी केले होते. ती घटना पुढे १९४७ साली अप्पासाहेब लाड मास्तरांनी प्रसिद्ध केली होती. यावरुन अंदाज करता येईल की ग्रामराज्य - लोकराज्य - समांतर सरकार कसे असावे यावर घटनासमितीत चर्चा व संवाद झाले. त्यात नाना पाटील, जी.डी. लाड, अप्पासाहेब लाड, नाथाजी लाड अशांसारखी

मंडळी होती आणि तिचा मसुदा ( Draft) अंतिम रण्याची जबाबदारी डॉ. उत्तमराव पाटलांनी पार पाडली. त्यांच्या जोडीला अप्पासाहेब लाड गुरुजी होतेच हेही लक्षात घ्यावयास आहे.

तसेच कुंडल येथे व्यायाम शाळा उभारली आणि त्यात लष्करी पद्धतीवर सेना उभारली, तिचे नाव 'तुफान सेना' ठेवण्यात आले. "त्यात ५००० सैनिक व २५० कॅप्टन होते. ही मूळ कल्पना अप्पासाहेब लाड यांची असून ह्या सैनिकांची व्यवस्था अप्पासाहेब व जी.डी. लाड हे क्रांतिसिंहाच्या देखरेखीत पहात. "[७] सैन्य दलाला नामाभिधान केल्याचा उल्लेख डॉ. उत्तमराव पाटलांनी क्रांतिपर्वात केला आहे ते म्हणतात, "शेकडोंनी सैनिक गावोगांवी तयार झाले होते. त्यांना प्रशिक्षण देण्याची वेळ आली म्हून कुंडलला सैनिक शिबीरे घेण्याचा निर्णय झाला. हिटलरच्या स्टॉर्म ट्रूप्सचा व त्यांच्या बलिदान पथकांचा इतिहास माझ्या डोळयापुढे धगधगत होताच. त्या प्रमाणेच आपलेही हे सैनिक त्यांना 'तुफान' सैनिक असे नामाभिधान मी सुचवले. सर्वांना ते आवडले. तुफान सैनिक शिबिराची आमची मालिका सुरु झाली. "[८] अप्पासाहेब लाड या शिबीराचे प्राचार्य तर डॉ. उत्तमराव आचार्य व आचारी होते. अप्पासाहेब लाडांची सैन्यदल असावे अशी कल्पना तर डॉ. उत्तमराव पाटलांचे 'तुफान'असे नामाभिधान व जी.डी. लाडांचे फिल्डमार्शल म्हणून सैन्यसंचलन या तिघांचा मिलाफ आणि क्रांतिसिंहाची प्रेरणा व मार्गदर्शनाने एवढे मोठे 'तुफान सैनिक दल' उभा राहीले. अप्पासाहेब लाड 'तुफान' नावाचे समर्थन करताना लिहतात की, "योद्धा हा स्वाभिमानी असतो आणि स्वाभिमान तेवत ठेवणारे नामाभिधानच त्याला जागृत ठेवते, म्हणून शूरत्वाने तळपणाऱ्या जगांतील संघटना जर पहिल्या तर त्यांची नावे ठोस व आवेशयुक्त दिसतील. उदाहरणार्थ - हिटलरचे स्टॉर्म ट्रूपर्स, रशियाची लाल सेना किंवा भारत - गौरव सुभाषचंद्रांची आझाद हिंद फौज घ्या, अशा जगाला दिपवून टाकणाऱ्या संघटना जर घेतल्या तर त्यांच्या नावांतच त्यांच्या कृतींचे सार ओतलेले आपणास दिसून येईल. या दर्शनांच्या उगमांतूनच 'तुफान' या नामाभिधानाचा उगम झाला. "[९] यावरुन आपणास असा निष्कर्ष मांडता येतो की, डॉ. उत्तमराव पाटील, (महादू धनगर उर्फ महादू मामा) यांचे स्थान व महत्व प्रतिसरकारात व त्यांच्या नेतृत्वात किती वरचे व श्रेष्ठ दर्जाचे होते.

याशिवाय डॉ. उत्तमराव पाटील व लीलाताईंनी आपला प्रचार व प्रसार दौरा त्या विभागात कार्यकर्त्यांसमवेत फिरवून राबवला. याबाबत प्रतिसरकारचे अभ्यासक प्रा.डॉ. अरुण भोसले, कोल्हापूर तपशील देतात की, "The Group efficiently managed the Propoganda wing of patri-sarkar: Shankar Nikam, the famous ballad singer impressed the masses by his Singing performances. Like Nana patil, Dr. Uttamrao Patil and Mrs. Leela Patil, who were then staying in the District, Carried on propoganda Campaigns effectively."[१०] खानदेशातील डॉ. उत्तमरावांसोबत बाबुराव गुरव (शाहू गुरव), शिवराम महिपत पाटील (आबा) शिंदखेडा जि. धुळे यांनी प्रतिसरकारच्या तुफान सेनेत प्रत्यक्ष दाखल होऊन 'तुफान सैनिकाची' जबाबदारी पार पाडली. डॉ. उत्तमरावांना त्यांनी शेवटपर्यंत साथ दिली. उत्तमराव पाटील त्यांच्यासंबंधी व कामाबाबत क्रांतिपर्वात त्यांचा इतिहास मांडायला विसरले नाहीत ते लिहतात, "साताऱ्यातील पत्री सरकार स्थापण्याच्या कार्यक्रमात खानदेशातील माझे सहकारी फक्त दोनच, जे शेवटपर्यंत माझ्या साथीत होते. एक शिवराम म. पाटील व दुसरा बाबुराव गुरव (शाहू). दोघेही शिंदखेडयाचे. त्यांनी तुफानसेनेत जी.डी. बापुच्या अधिपत्याखाली काम केले. त्यात बाबुराव हरहुन्नरी म्हणून शस्त्रास्त्रे मिळविण्यात, ती ने-आण करण्यात व विशेष कार्यक्रमात आघाडीवर राहीला."[११] या बाबुराव रवांबाबत जी.डी. लाड आपल्या आत्मचरित्रात आवर्जून उल्लेख करताना म्हणतात, "माझ्या वयाचा एक युवक. देशभक्तीने वेडा झालेला आणि गोड गाणी म्हणणारा अद्याप विसरु शकत नाही."[१२]

जी.डी. बापू लाड तुफान सेनेसाठी इंग्रजांच्या मालकीचे शस्त्र लुटत असत परंतु सैनिकांची संख्या वाढल्याने तीही तुटपुंजी ठरु लागले होते. सुरुवातीच्या कार्यतंत्राप्रमाणे जी.डी. बापू लाडांनी गोव्याहून शस्त्र खरेदी पुन्हा सुरु ली होती. त्या शस्त्र खरेदीचा एक प्रसंग (मार्च १९४५) त्यांच्या जीवावरच बेतला होता. त्यावेळेस त्यांच्या साथीला होते खानदेशी वीर बाबुराव गुरव. त्या प्रसंगाचे वर्णन मांडतांना कॅ. रामचंद्र लाड लिहतात, "भूमिगत अवस्थेमध्ये बापू व त्यांचे सहकारी खानदेशमधील श्री. बाबुराव ऊर्फ शाहू गुरव असे दोघे, बेळगांवला श्री. जेऊरकर या कार्यकर्त्यांचेकडे थांबत असत."[१३] त्या प्रसंगात जेऊरकरांच्या गद्दारीमुळे ते पकडले गेले असते परंतु दोघांच्या सावधानता व समयसूचकतेने वाचले. बाबुराव गुरव व शिवराम पाटील यांचा प्रवास साताऱ्याकडे कसा झाला या विषयी चर्चा

रतांना कॅ. राम लाड आपल्या मुलाखतीत सांगतात, "त्यांना डॉ. उत्तमराव पाटलांनीच बोलावणं धाडलं होते. त्यांनी अजूनही खानदेशातील इतरांनाही प्रतिसरकारचे कार्य बघावयास बोलावयास त्यांना सांगितले होते. कारण डॉ. उत्तमरावांनाही हे सातारचे प्रतिसरकार तिकडे खानदेशात विस्तारीत करावयाचे होते परंतु या दोघां शिवाय दुसरे, कुणीच आले नाही. डॉ. उत्तमरावांना तिकडील लोकांनी साथ दिली नाही. गुरव व पाटील मात्र शेवटपर्यंत आमच्यात थांबले होते हे विशेष"[१४]

याबाबत कॅ. महादेव मिरगेंकडूनही जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता ते सांगतात, "शिवराम आबा व बाबुराव गुरव हे डॉ. उत्तमरावांचे जवळचे मित्र तर होतेच शिवाय भूमिगत कालखंडात भूमिगत राहण्यास त्यांच्या तिकडे एकमेकाला मदत करत. त्यानंतर त्यांना पुन्हा सुरक्षिततेसाठी व प्रतिसरकाराचा परिचय घडवून देण्यासाठी बोलावले होते. ते अत्यंत चांगले व शूर होते. बाबुराव गुरव तर सर्व तुफान सैनिकांचा लाडकाच होता."[१५] तसेच विश्वासराव एम. पाटील व त्यांच्या पत्नी इंदूताई पाटील ह्याही प्रतिसरकार मधील एक सैनिक होऊन भूमिगतांना पाठींबा देत तर कधी पाठराखण करीत. लीलाताईंना जेलमधून पळविण्याकरीता चिठ्ठयाचपाटया व्ही.एम. पाटलांनीच नेल्या होत्या. इंदूताई तर सदैव लीलाताई सोबतच राहत असत. ते मुळचे जुवार्डी ता. भडगांव जि.जळगांव येथील होते.

**प्रतिसरकारचा महाराष्ट्रातील विस्तार** - सन १९४५ चे वर्ष व त्याच्या उत्तरार्धातील घडामोडी ह्या प्रतिसरकारच्या इतिहासाला कलाटणी देण्याची पूर्वतयारी करीत होते. १९४२ च्या आंदोलनातून उत्क्रांत झालेले प्रतिसरकार १९४५ च्या मध्यापर्यंत पुर्णावस्थेला आले नंतर मात्र ते त्याच्या यशाच्या अत्युच्च शिखरावर पोचू लागले होते. ऑगस्ट १९४५ च्या सुमारास कुंडल येथे विशेषता कुंडल ग्रुपच्या युद्धमंडळाची बैठक भरली. त्यात क्रांतीसिंह नाना पाटील अध्यक्षस्थानी व २०० च्या वर प्रमुख हजर होते. त्यात प्रतिसरकारची पुढची योजना काय? यावर चर्चा झाली आणि महाराष्ट्रभर प्रतिसत्तेच्या चळवळीचा विस्तार करण्यासाठी पूर्वतयारी म्हणून प्रत्येक जिल्ह्याला आपले तळ उभे करण्याचा संकल्प व त्याची रुपरेखा मांडली व जबाबदाऱ्या वाटल्या. याबाबत जी.डी. बापू सांगतात ी, "आपली चळवळ महाराष्ट्रभर पसरण्याची पूर्व तयारी केली पाहीजे. त्यासाठी सर्व जिल्ह्यातून आपले तळ तयार केले पाहिजेत. त्यासाठी कोल्हापूर, बेळगांव, नगर, नासिक, धुळे आणि विदर्भ जिल्ह्यातून संपर्क साधले पाहीजेत. .... एवढे घडले की केवळ सहा महिन्यात आपण पश्चिम महाराष्ट्र पादाक्रांत करुया"[१६] ठरल्याप्रमाणे महाराष्ट्रभर तळ उभे राहू लागले. धुळे (पश्चिम खानदेश) जिल्ह्यात यापूर्वीच्या संबंधातून बोरकुंड, वडजाई, मोहाडी व धुळे येथे तालीम संघ स्थापले. त्यात युवक व शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद राहिला. जळगांवा (पूर्व खानदेश) जिल्ह्यात बोदवड, भुसावलच्या परिसरात कॅ. आकाराम पवार व कॅ. राम लाड यांच्या मदतीने तळ निर्माण झाला.

**संदर्भ सूची -**

*१)पाटील माधवराव धनाजी , बोदवड यांचे डॉ. उत्तमराव पाटलांस पत्र, दि.२५/१/८९*
*२)लिमये मधु (२०००), आत्मकथा, अक्षर प्रकाशन मुंबई, पृ. ३११*
*३)लाड जी.डी. (२००५), पेटलेले पारतंत्र्य धुमसते स्वातंत्र्य, कुंडल जि.सांगली पृ. १८८*
*४)कॅ. रामचंद्र श्रीपती लाड व कॅ.आकाराम पवार, कुंडल ता. पलुस (सांगली) यांच्या मुलाखती, दि. २/२/२०१२ वेळ - दु. १.०० वा.*
*५)पाटील डॉ. उत्तमराव व लाड अप्पासाहेब (१९४७), दे.भ. नाना पाटील, पृ. १३०*
*६)आळतेकर ग.स. ऊर्फ दादासाहेब, सातान्याचे प्रतिसरकार व क्रांतिसिंह, पवार डॉ. जयसिंगराव (संपा.),उनि, पृ.७६*
*७)तत्रैव, पृ. ७५,७६*
*८)पाटील उत्तमराव (१९८७), क्रांतीपर्व, डॉ.हेमंत देशमुख दोंडाईचा पृ. ३१७*
*९)पाटील डॉ. उत्तमराव व लाड अप्पासाहेब (१९४७), उनि, पृ. १४५*
*१०)Bhosale Dr. A.R., History of Freedom movement in Satara District (from १८८५ to १९४७ ) A Critical study. A thesis Submitted to the shivaji University, Kolhapur for the Degree of Doctor of philosophy in history, पृ. २७०*
*११)पाटील उत्तमराव (१९८७), उनि, पृ. ११९*
*१२)लाड जी.डी. (२००५), उनि, पृ. १२३*
*१३)लाड रा.श्री. (१९८३), प्रतिसरकारचे झुंजार सेनापती - जी.डी. बापू, जी.डी. ऊर्फ बापुसाहेब लाड गौरवांक, पृ. २३*
*१४). लाड रा.श्री. ,कुंडल यांची मुलाखत, दि. १७/१०/२०१३, वेळ - दु.१.०७ वा.*

*१५)कॅ. मिरगे महादेव तु.,वेळापुर यांची मुलाखत, दि. १९/१०/२०१३*
*१६)लाड जी.डी. (२००५), उनि, पृ. १८५*